# प्रेसनोट ०५/११/२०१८

आज दिंनाक ०५/११/२०१८ रोजी सकाळी ११.०० ते १५.०० वा दरम्यान हडपसर पोलीस स्टेशनचे हददीत सार्वजनिक ठिकाणी फटाका स्टॉल लावून लोकांचे जिवीतांस हाणी पोहचवणा-या फटाका दुकानांवर कारवाई करणेकामी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुनिल तांबे यांनी तीन वेगवेगळी पथके तयार करुन,हडपसर भागात १५ अधिकारी व ५० कर्मचारी यांचे सोबत कारवाई केली आहे. सदर करवाईत एकुण ३९ ठिकाणी अनाधिकृत फटाका दुकान मालकांवर कारवाई करुन संबधीत ३९ फटाका दुकान मालकांवर भा.द.वि.क.१८८,२८६,३३६,महाराष्ट्र पोलीस अधिनियम ॲक्ट ३३/एच/१३१ प्रमाणे गुन्हे दाखल करुन पंचनामे करुन माल जप्त करण्यात आलेला आहे.सदर जप्त मुददेमाल शिवाजीनगर येथील सरकारी गोडावून मध्ये रवाना करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी ही अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रोदशिक विभाग श्री सुनिल फुलारी सो,परिमंडळ-०५ चे पोलीस उप-आयुक्त मा. श्री प्रकाश गायकवाड सो,हडपसर विभागाचे मा.स.पो.आ.श्री.सुनिल देशमुख सो यांचे मार्गदर्शनाखाली हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सुनिल तांबे,पो.नि.गुन्हे श्री.शिवाजी शिंदे,पो.नि.गुन्हे श्री.हमराज कुंभार,व हडपसर पोलीस स्टेशन कडील १३ अधिकारी व ५० कर्मचारी यांनी केली आहे.